जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नाला खोलीकरण / रुंदीकरणाच्या लोक सहभागातून होणाऱ्या कामांकरीता ग्रामपंयाचत, खाजगी व्यक्ती, अशासकीय संस्था यांनी यंत्रसामुग्री उपलब्ध केल्यास त्यांना दयावयाचे दर निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२४/जल-२०**
**हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,**
**मंत्रालय,मुंबई-४०००३२**
**दिनांक: ४ सप्टेंबर, २०१७**

पहा - १) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/ जल-७, दिनांक ५ डिसेंबर, २०१४.
२) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक मफुअ-२०१६/प्र.क्र.६८/ जल-८, दिनांक ४ मे, २०१६.
३) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक गामुध-२०१६/प्र.क्र.१३४/ जल-१, दिनांक ६ मे, २०१६
४) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक गामुध-२०१७/प्र.क्र.६२/ जल-८, दिनांक २५ मे, २०१६.

**शासन परिपत्रक :**

राज्यात जलयुक्त शिवार अभियान हा महत्वाकांक्षी कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत असून अभियानांतर्गत नाला खोलीकरण/रुंदीकरण करण्याचे काम करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे जलयुक्त शिवार मधील गावांव्यतिरिक्त इतर ठिकाणी देखील अशा स्वरुपाची कामे घेण्यात येत आहेत. सदरचे काम शासकीय यंत्रणेबरोबरच लोकसहभागातून देखील करण्यात येत आहे. या नदी /नाला /ओढा खोलीकरण/ रुंदीकरणाच्या कामाबरोबरच Deep CCT करणे ,शेततळी ,डोह यामधील गाळ काढणे इत्यादी कामे लोकसहभागातून अशासकीय संस्थांना CSR च्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधीमधून करण्यात येत असल्याने अशा कामांकरीता,राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत महात्मा ज्योतीबा फुले जलभूमी संधारण अभियान या योजनेखाली प्राप्त होणाऱ्या अनुदानातून तसेच जिल्हा नियोजन विकास समितीकडे उपलब्ध असलेल्या Gap Funding च्या निधीमधून त्याचप्रमाणे नाविण्यपूर्ण योजनांकरिता राखून ठेवलेल्या ३.५ टक्के निधीमधून यंत्रे/वाहने यासाठी होणाऱ्या डिझेलच्या खर्चाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने यापूर्वीच सूचना दिलेल्या आहेत. अशा कामाकरिता यंत्रनिहाय प्रति घनमिटर गाळासाठी डिझेल या घटकाकरिता कोणत्या दराने रक्कम अदा करण्यात यावी हे यापूर्वी दि. ४ मे,२०१६ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये निश्चित करुन देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेंतर्गत डिझेल करिता लागणारा निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचे धोरण शासनाने स्वीकारले आहे. त्यानुसार शासन परिपत्रक ,क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क.१३४/जल-१,दि.१६मे,२०१७ अन्वये निधी वितरणाची कार्यपध्दती सविस्तरपणे विशद करण्यात आलेली आहे.

२. मुख्य अभियंता यांत्रिकी विभाग, जलसंपदा विभाग यांना प्रतिघन मिटर इंधनाकरिता येणारा खर्च त्याचप्रमाणे यंत्र विनाइंधन व इंधनासह यंत्र याकरिता दर निश्चित करुन देण्याची विनंती करण्यात आली होती. त्यांचेकडून प्राप्त झालेल्या दरानुसार लोकसहभागातून नाला खोलीकरण/ रुंदीकरणाकरिता ग्रामपंचायत, अशासकीय संस्था, खाजगी व्यक्ती,यांनी यंत्रसामुग्री उपलब्ध केल्यास प्रतिघनमिटर इंधनासह यंत्र याचा येणारा सरासरी खर्च रुपये २७/- (रुपये सत्तावीस मात्र) इतका कमाल दर निश्चित करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच यासंदर्भात मार्गदर्शक सूचना परिशिष्ट “अ” प्रमाणे सोबत जोडण्यात येत आहेत.

३. जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत करण्यात येणारे नालाखोलीकरण/रुंदीकरण हे काम लोकसहभागातून करण्यात यावे व त्याकरिता या परिपत्रकासोबत जोडलेल्या परिशिष्ट “अ” मधील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

४. सदर शासन परिपत्रक वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४०२/२०१७ दिनांक २१ ऑगस्ट,२०१७ नुसार निर्गमित करण्यात येतआहे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७०९०४१४४६४३४४२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Eknath Rajaram Dawale

Digitally signed by Eknath Rajaram Dawale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=499dd4df91587ffef1e20a2ee9e560dd0777e49ff6cfc838f362fdbb58c58e7b, cn=Eknath Rajaram Dawale
Date: 2017.09.04 17:11:20 +05'30'

(एकनाथ डवले)
सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
४) सर्व सन्माननीय विधानसभा/ विधानपरिषद व संसद सदस्य.
५) मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
६) मा.राल्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
७) सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८) अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई
९) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई ३२
१०) सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) मंत्रालय,मुंबई ३२
११) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे ४११ ००१
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे ४११ ००१

१४) प्रधान मुख्य वनसरंक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे
१५) मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण),पुणे
१६) मुख्य अभियंता, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर
१७) संचालक,महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे
१८)संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१९) मुख्य कार्यकारी अधिकारी/ अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे
२०) महासंचालक, माहिती व जलसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता),
२१) सर्व जिल्हाधिकारी
२२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी/ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२३) महालेखापाल एक व दोन, महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता),
२४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२५) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
२६) सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय,
२७) सर्व उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय
२८) सर्व विभागीय कृषि सह संचालक
२९) सर्व अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ
३०) सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
३१) सर्व कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण)
३२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३३) सर्व मंत्रालयीन विभाग
३४) सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कार्यासन अधिकारी,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई ३२
३५) नियोजन विभाग/ वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई ३२
३६) जल २०, निवड नस्ती

**शासन परिपत्रक ,मृद व जलसंधारण विभाग क्रमांक -संकीर्ण २०१७/प्र.क्र.२४/जल-२०, दिनांक ४ सप्टेंबर,२०१७ सोबतचे परिशिष्ट "अ"**

(१) शासन निर्णय, जलसंधारण विभाग,क्र.राकृयो-२०११/प्र.७२/जल-७,दिनांक ९ मे, २०१३ अन्वये नाला खोलीकरण करण्याबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शन सूचना निर्गमित केलेल्या असून, त्यांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे व त्यानुसारच नाला खोलीकरण करण्याची कामे हाती घेण्यात यावीत.

(i) नाला खोलीकरण हे फक्त २nd व ३rd order या वर्गीकरणातील जलप्रवाहांवरच घेण्यात यावे. कारण भौगोलिक रचनेनुसार १st order streams या सर्वसाधारण वहनक्षेत्र ( Runoff Zone),२ nd order व ३ rd order या पुनर्भरणक्षेत्र (Recharge Zone) तर ४ th order व त्यापेक्षा मोठे जलप्रवाह हे साठवण क्षेत्र (Storage Zone) या भागांमध्ये स्थित असतात.

(ii) उपलब्ध अपधावेच्या (Surface Runoff Calculation) सिमीत राहूनच नाला खोलीकरणाची लांबी निश्चित करावी.

(iii) ज्या ठिकाणी नालापात्रात वाळू साठा आहे अशा नाल्यांचे खोलीकरण करु नये .

(iv) ज्या ठिकाणी नालापात्रांची नैसर्गिक खोली ३ मीटरपेक्षा जास्त आहे अशा ठिकाणी खोलीकरण भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणेच्या मार्गदर्शनाने करावे.

(v) नाला खोलीकरणासाठी कठीण पाषाणात खोदकाम करु नये म्हणजेच मुरुमाच्या थराखाली खोदकाम नसावे. कारण या उपाययोजनेद्वारे भूस्तरावरील उथळ जलधारक (Shallow Aquifer) पुनर्भरित करणे हा उद्देश आहे. कठीण पाषाणाची जलधारक क्षमता अत्यंत कमी असल्याने तसेच त्यातून जमिनीखाली पाणी झिरपण्याची गती अत्याधिक मंद असल्याने कठीण पाषाणात खोदकाम केल्यास योजनेचा खर्च फार जास्त होईल. तुलनेत पुनर्भरण नगण्यच स्वरुपाचे होईल.

(vi) नाला खोलीकरणाची कमाल मर्यादा नाला तळापासून (Nala Bed) ३ मीटर असावी

(vii) अतिशोषित पाणलोट क्षेत्रामध्ये ही कामे अग्रक्रमाने राबविण्यात यावीत.

(viii) अस्तित्वातील बंधाऱ्यांच्या उर्ध्ववाह क्षेत्र (Up Stream side) मध्ये नाला खोलीकरण केल्यास जास्त लाभदायक होईल.

(ix) गाळाच्या प्रदेशात (Alluvial Area) नाला खोलीकरणाचे काम हाती घेणे योग्य नाही. कारण अशा ठिकाणी clay चा थर Impervious असल्यामुळे सदर पाणी जमिनीत मुरुन भूजलामध्ये रुपांतरीत होणार नाही. त्यामुळे अशा परिसरात खोलीकरण करण्यात येवू नये. सर्वसाधारणपणे असा भूभाग नालाखोलीकरण करण्यासाठी भूशास्त्रीयदृष्टया अनुकूल नसतो. अशा परिसरात भूस्तरातील गाळाचा (Clay) थर हा पाणी खाली झिरपू देत

नसल्याने नाला खोलीकरण केले तर त्यामध्ये पाण्याची साठवण होईल. परंतु हे साठलेले पाणी जमिनीत मुरुन भूजलांत रुपांतरित होणार नाही.

(x) गाळाच्या भूभागातील "बझाडा" भूस्तराचा भाग हा नाला खोलीकरण या उपाययोजनेसाठी अत्यंत योग्य आहे. कारण सातपुडा पर्वत श्रेणीच्या, पायथ्याच्या टेकडया (Foot Hills) चा उतार संपल्या-संपल्याच बझाडा प्रकारचा भूस्तर असून तो लहान मोठे टोळदगड (Boulders) व टेकडयांची धूप झाल्याने वाहून आलेले Silt यापासून बनलेला आहे. या भूस्तराची जलग्रहण क्षमता ( Water Intake Capacity ) जास्त आहे. गाळाच्या प्रदेशाच्या एकूण विस्ताराच्या तुलनेत बझाडा भूभाग हा फारच कमी आहे. परंतु गाळाच्या भूभागात उपलब्ध होणारे भूजल हे प्रामुख्याने अशा बझाडा झोनद्वारेच भूस्तरात पुनर्भरित होते. त्यामुळे अशा भूभागांत मोठया प्रमाणावर नालाखोलीकरण उपायोजना राबविण्यात यावी.

(२) नाला खोलीकरण/रुंदीकरण ही कामे प्रचलित दरसूची मधील दरानुसार न करता शासन स्तरावरुन प्रतिघन मीटर उत्खननाच्या निश्चित दरानुसार करण्यात यावीत.

(३) कंत्राटदारामार्फत करण्यात येणाऱ्या कामामध्ये अनावश्यक वहन व कठीण स्तराचा परिमाण दाखविल्यामुळे काही ठिकाणी अतिरिक्त खर्च झाल्याचे या कामांमध्ये निदर्शनास आलेले आहे. याबाबी टाळण्याची दक्षता घेण्यात यावी.

(४) ज्याप्रमाणे गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या कार्यक्रमामध्ये वहनासाठी येणारा खर्च हा लोकसहभागातून केला जातो, अशाच प्रकारे नालाखोलीकरणामध्ये आवश्यकतेनुसार माती वहनाचा खर्च हा लोकसहभागातून करण्यात यावा.

(५) नाला खोलीकरण/रुंदीकरण, गाळ काढणे या कामांमध्ये ज्या ठिकाणी गाळ शेतात टाकणे शक्य आहे अशा ठिकाणी तो गाळ शेतकऱ्यांच्या शेतात टाकण्यात यावा. ज्या ठिकाणी असा गाळ जमिनीस उपयुक्त नाही तो गाळ नाल्याच्या दोन्ही कडेस टाकण्यात यावा.

(६) खोलीकरण करताना नाला काठास १: ०.५० बाजू उतार ठेवण्यात यावा. नाल्यातील काढलेला गाळ शेतकऱ्यांनी स्वखर्चाने त्यांचे शेतात टाकावा व खोलीकरणातून निघालेली माती १ मी.बर्म सोडून नाला काठावर टाकावी. नाला काठावर टाकलेल्या मातीपासून तयार होणाऱ्या बांधास दोन्ही बाजूस १: १ उतार द्यावा. बांधाची माथा रुंदी १ मीटर ठेवावी. बांधाची उंची निघणाऱ्या परिमाणाचा विचार करुन ठेवावी. खोलीकरणातून निघालेली सर्व माती नाला काठावर बसत नसेल तर नाला काठाच्या बांधावर न बसणारे परिमाण जे शेतकरी घेऊन जाण्यास तयार असतील त्यांना घेऊन जाण्यास अनुमती द्यावी.

(७) लोकसहभागातून नाला खोलीकरण/रुंदीकरण करताना बंधाऱ्याच्या वरील बाजूस नालापातळीप्रमाणे १० मी. अंतर सोडून खोलीकरण करण्यात यावे.

(८) नाला खोदकामातून निघालेले साहित्य नाल्याच्या दोन्ही तिरांवर मार्गदर्शक बांधाच्या (Guide Bund) स्वरुपात वापरावेत.

(९) नाला तिरावरील मार्गदर्शक बांधावर वृक्षारोपण,हरळी/कुंदा गवत /वेलीवर्गीय गवत इत्यादी लागवड करण्यात यावी.

(१०) नाला खोलीकरणाकरिता डिझेल व मशिनरी यासह एकत्रित कमाल दर रुपये २७/-(रुपये सत्तावीस मात्र) प्रतिघनमीटर इतका निश्चित करण्यात येत आहे. हा दर मुख्य अभियंता यांत्रिकी जलसंपदा विभाग यांचेकडून प्राप्त दराच्या सरासरीनुसार निश्चित करण्यात आलेला आहे. या व्यतिरिक्त इतर होणारा खर्च, (वहन व खोदकामावर होणारा खर्च ) हा लोकसहभागातून करण्यात यावा. ज्याठिकाणी फक्त डिझेलकरिता निधी देण्याबाबत कार्यवाही करावयाची आहे याकरिता शासन पत्र क्रमांक -गामुध-२०१७/ प्र.क्र.६२/ जल-८,दिनांक २३ मे २०१७ अन्वये निश्चित केलेल्या दरानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(११) उपरोक्त परिच्छेद (१) ते (१०) मध्ये नमूद सूचनांच्या अनुषंगाने काम करण्याची कार्यपध्दती ही खालील प्रमाणे राहील:-

i. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत गाव आराखड्यानुसार नाला खोली करणाच्या कामाचा समावेश असणाऱ्या गावाची व संख्येनिहाय कामाची यादी एकत्रित करुन यापैकी कामे ग्रामपंचायत व यंत्रणा यामध्ये उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ व क्षमता या आधारे जिल्हा स्तरीय समितीने त्याची विभागणी करावी.

ii. ग्रामपंचायती मार्फत करण्यात येणाऱ्या कामाचे पूर्ण तांत्रिक मार्गदर्शन हे कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद यांचेमार्फत करण्यात येईल. सदर कामे तांत्रिक अधिकाऱ्यांच्या पर्यवेक्षणाखाली करण्यात यावीत. यंत्रणांकडील करण्यात येणाऱ्या कामाना त्या त्या यंत्राणांचे जिल्हा प्रमुख्य हे जबाबदार राहतील.

iii. गाव आराखडा निहाय नाला खोलीकरण करणाऱ्या कामाचे परिमाणानुसार कमाल दर रुपये २७/-(रुपये सत्तावीस मात्र) प्रति घनमीटर प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. त्याकरीता नाल्याच्या Level घेण्यात याव्यात व आवश्यकतेनुसार Trial Pit घेण्यात यावे व अंदाजपत्रकास उचित प्राधिकाऱ्याची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

iv. जेसीबी/पोकलेन धारक निश्चित करण्याकरिता गावातील व्यक्तींकडे जर अशा प्रकारची मशिनरी असेल तर त्यास प्रथम प्राधान्य देण्यात यावे. गावात अशी व्यक्ती उपलब्ध नसल्यास तालुक्यातील व्यक्तीस प्राधान्य देण्यात यावे. तालुक्यात जर अशी व्यक्ती उपलब्ध नसेल तर जिल्ह्यातील व्यक्तीस प्राधान्य देण्यात यावे.

v. वरील प्रमाणे प्राथम्यक्रम निश्चित करताना एकापेक्षा जास्त जेसीबी/पोकलेन धारक असल्यास त्यांना शेतकऱ्याच्या सहमतीने काम विभागून देण्यात यावे, जेणेकरुन हे काम तात्काळ, पारदर्शक व निकोप स्पर्धात्मक पध्दतीने होईल. याबाबत जिल्हास्तरीय समितीने आवश्यक ती कार्यपध्दती निश्चित करावी व त्यानुसार कार्यवाही करावी .

vi. नाला खोलीकरण व रुंदी करणाचे काम सुरु करण्यापूर्वी १० सेकंदाची व्हिडीओ क्लिप तयार करण्यात यावी. ज्यामध्ये प्रत्यक्ष शेतकरी, जेसीबी/पोकलेन धारक आणि सर्वसाधारण नदी काठ व नदीची तळ पातळी याचा समावेश त्या व्हिडीओ क्लिपमध्ये असावा. ही व्हिडीओ क्लिप कामाचे Geo Tagging करताना अपलोड करण्यात यावी. अशा प्रकारची दुसरी व्हिडीओ क्लिप काम सुरु असतांनाची अपलोड करण्यात यावी व तिसरी व्हिडीओ क्लिप ही काम पूर्ण संपल्यानंतर अपलोड करण्यात यावी.

vii. नाला खोलीकरण व रुंदीकरण करण्यापूर्वी मोजमाप व पातळी घेण्यात यावी. तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण कामानंतरची पातळी घेण्यात यावी. प्रत्यक्ष मोजमापानुसार किती घ.मी.माती/मुरुमाचे उत्खनन झाले आहे ते निश्चित करावे. याचे मोजमाप घेण्याकरिता स्वतंत्र मोजवह्या (MB) ठेवण्यात याव्यात. या मोजवह्या मध्ये बॅरोपीट मधील प्रत्यक्ष उत्खननमध्ये काढण्यात आलेली माती व मुरुम यांचे मोजमाप घेवून त्यानुसार किती घन मीटर मातीचे उत्खनन केले आहे हे निश्चित करावे. तसेच काम योग्य प्रकारे झाले असल्याबाबत खोलीकरण केलेल्या नाल्याच्या लगतच्या शेतकऱ्यां समोर केलेला पंचनामा देयकासोबत जोडावा.

viii. मोजमाप वह्यामध्ये नोंदविल्यानुसार त्याची तशी देयके तयार करावीत व ती देयके मंजूर करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करावीत.

ix. अशा प्रकारे मंजूर करण्यात आलेल्या देयकाची देय रक्कम संबंधित जेसीबी/पोकलेन धारक यांच्या बँक खात्यावर RTGS/NEFT/EFMS द्वारे अदा करण्यात यावीत.

x. या कामांची गुणवत्ता राखली जाणे व अंमलबजावणी पारदर्शक पध्दतीने करण्याबाबत शासन परिपत्रक जलसंधारण विभाग,क्र.जलशि-२०१५/प्र.क्र.११५/जल-७,दिनांक १३ मार्च,२०१५ मधील सूचनांचे पालन करण्यात यावे

xi. नाला खोलीकरणाची कामे ही शासन निर्णय, जलसंधारण विभाग,क्र. राकृयो २०११/प्र.क्र.७२/जल-७,दिनांक ९ मे,२०१३ मध्ये दिलेल्या तांत्रिक मार्गदर्शक सूचनेच्या अधिन राहूनच करणे बंधनकारक राहील.

xii. बऱ्याच ठिकाणी नाला खोलीकरणाची कामे CSR/NGO यांचेमार्फत करण्यात येतात. CSR/NGO यांचेमार्फत उपलब्ध होणारा निधी व शासनाकडून उपलब्ध होणारा निधी (रुपये २७/- प्रति घन मिटर (कमाल दराप्रमाणे प्रमाणे) याचे अभिसरण करुन (Convergence) कामे करण्यास

हरकत नाही. अभिसरणाद्वारे करण्यात येणाऱ्या कामाकरीता CSR/NGO यांनी जिल्हास्तरीय समितीकडे प्रस्ताव सादर करावा. यामध्ये CSR/NGO द्वारे उपलब्ध होणाऱ्या रकमेचा हिस्सा स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. शासनाचा कमाल हिस्सा हा रुपये २७/- (रुपये सत्तावीस मात्र) प्रति घनमीटर या मर्यादेत राहील. CSR/NGO यांच्यामार्फत कामे करण्याची कार्यपध्दती व शासन हिस्सा देय करण्याची कार्यपध्दती जिल्हास्तरीय समितीने निश्चित करावी व त्यानुसार CSR/NGO यांचेसोबत MOU करण्यात यावा. तथापि ही कामे सक्षम असलेल्या तांत्रिक अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली करण्यात यावीत.

(१२) ही कार्यपद्धती नाला खोलीकरण/रुंदीकरण करण्यासंदर्भातील कामांबाबत असून तलावातीगाळ काढण्याकरीता या पुर्वीच दि. ६/०५/२०१७ व दि. २६/०५/२०१७ रोजीच्या शासन निर्णयनुसार निश्चित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

---------